REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 10 | JULY - 2018

# समाजातील लोकदैवत : रूढी, परंपरा आणि समजूती

**डॉ.मधुकर श्रीरंग पवार**
**(मराठी विभाग प्रमुख)**
**छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालय,सोलापूर.**

## प्रास्ताविक :-



लोकदैवतांच्या संबंधीत येणारी प्रत्येक गोष्ट ही लोकसंस्कृतीच्या व नागर संस्कृतीच्या परिकक्षेत येणारी गोष्ट आहे. संस्कृतीचे स्वरुप अतिशय व्यामिश्र व गुंतागुंतीचे आहे. संस्कृतीच्या व्याख्या अनेकांनी केल्या आहेत. इरावर्ती कर्वे संस्कृतीची व्याख्या करताना म्हणतात.'संस्कारपूर्ण व संस्कारमय जीवन जगण्याची देशकाल विशिष्ट रीत म्हणजे संस्कृती' या देशाच्या जडणघडणीत त्या त्या प्रदेशामधील वेगवेगळ्या छोट्या-मोठ्या संस्काराच्या पाऊलखुणा ठळक दिसतात.निरनिराळ्या जाती-जमाती, विविध भाषा, धर्म, पंथ, वंश असताना ही या देशाची संस्कृती टीकून आहे.

प्राचीन काळापासून मानवी समाजाचा विकास होत असताना अनेक चांगल्या-वाईट गोष्टी घडत होत्या.मानव जेव्हा शेती करू लागला तेव्हा, त्याला जननी आणि जमिन यांच्यातील अन्वयभाव दिसून आला. उत्पादन क्षमता असलेली जमिन आणि जनन क्षमता असलेली जननी यात आश्चर्यकारक साम्य आहे. त्यामुळे याविषया संबंधीची कुतूहलता अधिक वाढू लागली, मानवी जीवनात आदिदेवता या मातृदेवता आहेत, म्हणून यांचे स्थान वेगळ्या अर्थाने निर्माण झाले. रेणूका, भूमाता या देवींचे स्वरूप असेच आहे.रेणू-मातीचे कण यापासून रेणूका शब्दाची उत्पत्ती झाली. भू-म्हणजेच जमीन,माती यातून भूमाता ही आदिमाता आहे.अशा लोकदेवता मानवीमनात रूढ झाल्या.

लग्न प्रसंगी अनेक विधी या स्त्रीच्या प्रजोत्पादनाशी निगडीत आहेत.अक्षता डोक्यावर टाकणे म्हणजे जमिनीत धान्य पेरणे या दोन्ही गोष्टी प्रतिकात्मक आहेत.भाद्रपद महिन्यात देवीची,महालक्ष्मीची पूजा केली जाऊ लागली. याला अनुसरुन कांही सण,वार,उत्सव पाहिल्यास स्त्रीला देवता माणून केल्या जाणाऱ्या विधी पुढे रूढ झाल्या असाव्यात असे वाटते. कालीमातापूजा, दुर्गामातापूजा यांचेच परिणत रूप आहे. या देवतांना सर्वथा समर्पणाची चाल हळूहळू दृढ होऊ लागली, लोकदैवतांचा किंवा कुलदैवतांचा कोप झाला तर देवी, कॉलरा, पटकी, साथीचे रोग सुरू होतात. असा लोकसमजातून रुढी, परंपरा, आणि समजूती निर्माण झाल्या. त्यावर उपाय शोधण्यासाठी म्हसोबा, मुंजोबा, सात आसरा, मरिआई, जाखाई, जोखाई, सटवाई यांना नैवध्य करणे त्यांची पूजा करणे अशी लोकरुढी निर्माण झाली.

## लोकरुढी

समाजातील लोकांचे लोकजीवन त्यांच्या अभिव्यक्त जीवनाशी, आचार-विचाराशी निगडीतअसते. म्हणूनच लोकांचे आचार-विचार, प्रचलितरुढी, समजुती, परंपरा, विधी या सर्व बाबींचा समावेश यात होतो. समाजात परंपरागत चालत आलेल्या सर्वच कृती-उक्तीचा अभ्यास केला जातो. लोकरुढी आणि लोकसमजूती आजही लोकाचरणातून दृष्टीस पडतात. एखाद्या नव्या विचाराने प्रभावित झालेल्या गोष्टीचा लोक मानसावर परिणाम होतो आणि लोक त्यानुसार वागायला लागतात. या मुळे कांही लोकरुढी मनोरंजकही ठरतात. उदा.रामरक्षा म्हणून भिंतीची माती अथवा चुलीची राख अंगारा म्हणून लावली जाते. रुईच्या झाडाच्या फुलांची अथवा पानांची माळ शनिवारी मारुतीला घालण्याची लोकरुढी आजही आहे. मंदिरातील जळत्या समईचे तेल कपाळाला लावतात. अशा चमत्कारीक गोष्टी लोक करताना दिसतात.

आदिवासी निसर्गपूजक,देवतापूजकआणि प्राण्यांची पूजा करणारे आहेत. महाराष्ट्रातील आदिवासींची दैवते पर्यावरणाशी निगडीत आहेत. त्यांच्या देवता मूर्तीरूपात नाहीत, हजारो वर्षापासून हा समाज अशा दैवतांची पूजा करीत

आला आहे, त्यांच्या पूजा-अर्चा, विधी लोकरूढी याच्याशी निगडीत आहेत.सर्वांची जीवन पध्दती जवळपास सगळीकडे सारखीच आहे. लोकदेवताविषयी आदिवासी लोकांची अशी समजूत आहे. ही लोकदैवते आपल्या गावाचे, पिकांचे, शेती, जनावरे व पोरे-बाळे यांच्या संरक्षणासाठी आणि ईडा-पिडा टाळण्यासाठी आहेत. या विषयी त्यांची खात्री असते आणि म्हणूनच त्यांच्या शक्तिविषयी लोकमानसात एक विशिष्ट प्रकारचे भय, भीती असते

मॅकडूगल या मानसशास्त्रज्ञाने रूढी आणि रीतिरिवाज या संबंधी काही विचार मांडले आहेत. अनेक रूढी एकत्र येतात, त्यांची आपापसात तडजोड होणे आणि नवीन रूढी अस्तित्त्वात येते. कांही रूढी मानवी विकृत अनुकरणातून निर्माण होते तर कांही रूढी मानवी सहज प्रवृत्तीतून निर्माण होतात. या विषयी प्रभाकर मांडे म्हणतात, 'परंपरेने समाज जीवनात चालत आलेल्या रूढी आणि रीतिरिवाजांची उत्पत्ती अनेकाविध प्रकारे व निरनिराळ्या प्रेरणांतून झाली आहे. लोकसाहित्यात या सर्व पारंपरिक रूढीचा अंतर्भाव असतो व रूढी लोकसाहित्याच्या इतर प्रकारांशी जोडलेल्या असतात. समजुतींशी निगडीत असतात, परंपरेने चालत आलेल्या श्रध्दा, विश्वासांवर आधारित असतात'

लोक जीवनात अस्तित्वात असलेल्या लोकरूढीचे स्वरूप पाहताना लक्षात घ्यावे लागते की, कोणतीही लोकरूढी अचानकपणे रूढ होत नसते, तसे घडतही नसते. कारण रूढी निर्माण होण्यापूर्वी तत्कालीन परिस्थितीत तसे वागण्यामागे अथवा कृत्यामागे कांही प्रयोजने, हेतु, उद्यिष्ट्ये असतात, त्यामुळे तसे वागले जाते किंवा तसे केले जाते. उदा. मंदिरात निरंतर नंदादीप तेवत ठेवावा ही लोकरूढी आहे. पण प्राचिन काळातले ते एक प्रयोजन असावे कारण प्राचिन काळात देवाच्या मंदिराच्या गाभाऱ्यात अंधार असल्यामुळे कांही दिसत नसायचे, एवढेच काय दिवसासूध्दा कांही दिसत नव्हते, म्हणून नंदादीप अहोरात्र असावा, या प्रयोजनातून ही रूढी निर्माण झाली.

## लोकपरंपरा-

लोकसाहित्यातून अभिव्यक्त होणारे लोकजीवन धार्मिक विचाराने आणि दैवतांच्या प्रभावाने उत्साहित झालेले असते. देवतां विषयाच्या श्रध्दा,निष्ठा,लोकपरंपरेतून पहायला मिळतात.अशा परंपरा अनादी काळापासून चालत आल्या आहेत. परंपरा जपण्यात लोकांना विशेष आनंद वाटतो.

कांही परंपरा पापवाहक प्रथेचे गावातील लोकांनी सामूदायिक करावयाच्या विधी गावच्या रक्षणासाठी केल्या जातात.उदा.धोंडामारी महाराष्ट्रात इतर कांही गावात हा विधी केला जातो (ठरलेल्या दिवशी संध्याकाळी कार्तिक महिन्यात एका तिथीला) गावातील स्त्री-पुरूष एकत्र जमा होतात, त्याचे दोन गट तयार होऊन गावच्या नदीकाठावर किंवा ओढ्याच्या दोन्ही काठावर उभे राहून एकमेकांवर दगडफेक केली जात असे. या विधीत कधी कोणी गंभीर जखमी होत नाही, अशी लोकांची समजूत आहे.

लक्ष्मीआई किंवा मरिआईचे वारे पोतराजाच्या अंगात वारे शिरते, त्याच्या अंगात देवीचा संचार झाल्यावर तो भगत चमत्कार करून दाखवितो किंवा त्याच्या अंगात येते.अशा मुलाला दुसऱ्या पोतराजाच्या मांडीवर बसून पोतराजाची दीक्षा दिली जाते. अशा दीक्षा विधीला 'बढण' असे म्हणतात. हा विधी आषाढ श्रावण महिन्याच्या शुक्रवार किंवा मंगळवारी होत असतो. विधी परंपरेप्रमाणे होऊन हा मुलगा पोतराज होतो तो लक्ष्मीआईला नैवेद्य दाखवतो.

## लोकसमजूती

लोकजीवनात प्रचलित असलेल्या लोकसमजूती, लोकभ्रम, लोकधारणा याचाही अंर्तभाव लोकसाहित्यात करावा लागतो.प्रत्येक समाजात चालत आलेल्या भ्रामक समजूती,नवस, मंत्र-तंत्र,शकुन-अपशकुन यावर लोकांचा विश्वास असल्यामुळेच अनेक वेगवेगळ्या चमत्कारिक गोष्टी पाहायला मिळतात. अशा घटना खऱ्या की खोट्या याचा पुरावा उपलब्ध झालेला नाही. परंतु लोकसमजुती मात्र प्रचलित आहेत.

लोकजीवनात देवीच्या उपासनेत कवडीला महत्त्व आहे. अंबाबाई, जगदंबा, भवानी माता, यल्लम्मा या देवींच्या भक्तांच्या गळयात कवड्याची माळ, हातात परडी असते. त्याच्या मागे लोक संकेत आहेत असे दिसते. 'कवडी ही योनिप्रतिक म्हणून स्वीकारलेली आहे. सर्जनाच्या देवांनी कवडीला महत्त्व दिले, विवाहाप्रसंगी कवडीला विशेष महत्त्व आहे. भारतात अनेक राज्यातील सर्वसामान्य जाती, उपजाती आदिवासी समाजात दहेज देताना कवडी देण्याची परंपरा आहे.कवडी ही जीवनदायी, संतानदायी आणि सौभाग्यदायी अशी मानली गेली आहे. विवाह प्रसंगी वधूला कवडी भेट देणे, ही संतानदायक मानले जाते. कवडीच्या ठायी मातृदेवतांचा निवास असतो. अशी लोक समजूत आहे.

या लोकभूमित अनेक शतकानुशतकापासून देवनिष्ठा पूजा पध्दती यांच्या आधाराने ज्या त्या लोक समजूती यातून दृढ झालेल्या आहेत. त्यांचेच लोकरूढीत रूपांतर झाले आहे. आणि आजही त्या रूढी प्राणपणाने जतन केल्या जातात. आज

लौकिकात असा एकही विधी नाही की, जेथे लोकसंकेतांचा आधार घेतला जात नाही. म्हणून घरात लहान-मोठे कार्य असल्यास मग ते धार्मिक असो आणि अन्य कुठलेही कार्य असो दैवतांचा किंवा नैसर्गिक घटकांचा कौल घेतल्याशिवाय आमचा विधी पुढे सरकत नाही, ही आपल्या पूर्वजांनी घालून दिलेला परिपाक होता.

प्राचीन कालखंडात मनुष्यांच्या जीवनात निसर्गाला प्रचंड महत्त्व होते. त्यामुळे जर का निसर्गाचा कोप झाला तर आपले जीवन नष्ट होईल, अशी भीतीही मनात होती. माणसाचा विकास होत असताना निसर्ग, सृष्टी ज्या गतीने बदलत आहे, त्या गतीने माणूस बदलत आला. उदा. लोकांच्या मनात निसर्ग हेच आपले दैवत आहे. शेतकरी शेतीला आपली आई समजून तो तिची पूजा करीत असतो. शेतकऱ्यांच्या बायका श्रावण महिन्यात हिरवळीची पूजा करतात. सृष्टीदेवता आपल्या आरोग्याची काळजी करणारी आहे. असा विचार करणारी ती मानवाची पिढी होती. पूर्वजांकडून चालत आलेला वारसा

## निष्कर्ष :-

लोकरुढी, परंपरा आणि समजूती यावरुन तत्कालीन समाजमन,त्यांच्या नैतिक संकल्पना धार्मिक विचार ही स्पष्ट होतात. आज आत्याधुनिक उपकरणामुळे माणुस एकमेकापासून दुर जात आहे. त्यांच्यात विसंवाद निर्माण होत आहे. अशी भीती सर्वच घटकामधून व्यक्त केली जात आहे. तरीही यावर एक उपाय म्हणून .लोकदैवतांच्या संदर्भात आजही ज्या रुढी, समजूती प्रचलित आहेत. त्यातून ज्या जत्रा-यात्रा,उरुस भरवण्यात येतात.उदा.चैत्र महिन्यात गावोगावच्या यात्रा सुरु होतात.शेकडो वर्षापासून लहान-मोठ्या गावातून स्थानिक देवदैवतांच्या नावाने जत्रा भरते.या निमित्ताने का होईना लोक एकत्र येतात विचारांची देवाण-घेवाण होते. व्यापार,शिक्षण इतर कारणासाठी बाहेर प्रांतात गेलेले लोकांना, प्रथेप्रमाणे गावच्या दैवतांसाठी एकवेळ तरी गावाकडे यावे लागते. पारंपरिक लोककलांच्या माध्यामातूनही समाज प्रबोधन करता येते. ही जमेची बाजू आहे.आज जरी आधुनिकीकरणाचा वेग वाढत आहे असे वाटत असले, तरी पारंपरिक लोकजीवन संपुष्टात आलेले नाही. ही वस्तुनिष्टता आहे. उलट असे म्हणता येईल की नवीन तंत्रज्ञानाच्या साह्याने पारंपरिक लोकजीवन, त्यांच्या रुढी, प्रथा, संकेत, समजूती यांचे संकलन करुन व्यवस्थित त्यांची नव्याने मांडनी करता येईल.

## संदर्भ-टीपा

१. कर्वे इरावती, मराठी लोकांची संस्कृती,
२. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे अंतःप्रवाह,
३. भामरे सर्जेराव लोकदैवते आणि रथोत्सव
४. शिंदे विश्वनाथ, लोकधाटी अवलोकन आणि विचार,